बालगीते



बालशिक्षण केंद्रे चालवणाऱ्या शिक्षकांसाठी –

बालगीते

१९८७

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ
पुणे

प्रस्तावना

भाषा शिकणे, ती वापरणे आणि नवी भाषा तयार करत राहणे, हा मनुष्यप्राण्याचा एक मोठा आवडता छंद आहे. या छंदातून मानव अगदी लहान वयामध्येच आपल्या अवतीभोवतीच्या जगाचा अनुभव इतरांना सांगू पाहतो आणि स्वतःच्या मनातही अशा अनुभवांच्या स्मृती व्यवस्थित जुळवून ठेवत असतो. वयाच्या तिसऱ्या चौथ्या वर्षीच मुले जी अव्याहत बडबड करू लागतात आणि स्वतःच्या मनाने बडबड गीतांची रचना करू लागतात त्यांत या प्रवृत्तीचा स्पष्ट प्रत्यय येतो. लहान मुले केवळ इतरांकडून मिळालेले शब्द वापरतात असे नाही. आपल्या मनाने ती अनेक नवीन शब्द तयार करत असतात. अशा शब्दांची मालिका लयबद्ध पद्धतीने म्हणताना त्यांना खूप मौज वाटते. या वयाची मुले मोठ्या माणसांना प्रश्न विचारून अगदी भंडावून सोडतात. पण हे प्रश्न नेहमी उत्तर मागण्यासाठीच असतात असे नाही. तोच तो प्रश्न पुन्हा पुन्हा विचारताना एक प्रकारचे बडबड गीतच तयार होत असते; ते मुलांना आवडते. मुलांची साधी उत्तरेदेखील एक वाक्य एकदा म्हणून कधी संपत नाहीत. 'मला नको' एवढे म्हणायचे असले तरी मूल 'मला नको, मला नको, मला नको' असे म्हणत राहते. काही मागायचे झाले तरी 'मला दे, मला दे, अत्ता दे, अत्ता दे' असे गाणे सुरू होते. भाषेच्या लयबद्ध उपयोगाची मौज लुटण्याचा बराच मोठा उद्देश या शाब्दिक हट्टामागे दडलेला असतो. हा बालहट्ट नसून भाषा विकासाच्या मानवी छंदाचा तो आविष्कार आहे हे प्रौढांच्या लक्षात येत नाही. तीन ते सहा वयोगटातील मुलांना सांगायच्या गोष्टी बडबड गीतांच्या पद्धतीच्याच असाव्या लागतात. कारण त्या मुलांना नैसर्गिक वाटतात. अशा बडबडीच्या जोडीलाच आपले एक काल्पनिक जग निर्माण करण्यात या वयोगटातील मुले रंगलेली असतात. विविध प्रकारच्या अंतर्बाह्य अनुभवांची जुळणी होऊन या काल्पनिक जगाची जडणघडण होत असते. माणसे, जनावरे, पाखरे, पानेफुले यांच्यात लहान मुलांचे मन फारसा भेदभाव करत नाही. ती सगळ्यांशीच बोलत असतात, मैत्री करत असतात, आणि त्यांचे रुसवेफुगवेदेखील सगळ्यांबरोबरच चालू असतात. जातायेताना दरवाजावर हात आपटला तर दरवाजावर रागावून लहान मूल धपाधप चापट्या मारते हे आपण पाहतोच. जवळपास येऊन बसलेल्या कावळ्याशी मुलाची बातचीत चालू असते आणि मध्ये कावळा उडून गेला तर लहान मूल रागाने हातपाय आपटून रडूदेखील लागते. खरे जग आणि काल्पनिक जग यांच्या सीमा वयाच्या सहाव्या वर्षापर्यंतच अत्यंत अस्पष्ट असतात.

लहान मुलांचे मानसशास्त्र लक्षात घेऊन त्यांना गोष्टी सांगाव्यात, गाणी शिकवावीत आणि त्यांचा विकास सहजतेने होण्याला मदत करावी हे पालकांना आणि शिक्षकांना समजतेच असे नाही. त्यामुळे लहान मुलांच्या बडबडीला कटकट म्हणणारे आणि त्यांच्या कल्पनाविलासाला

खोटेपणा म्हणणारे प्रौढ आपल्याला आढळतात. बालशिक्षणाची मोहीम हाती घेऊन तिला शास्त्रशुद्ध उत्तेजन दिल्याखेरीज लहान मुलांच्या विकासातील अडथळे नाहीसे होणार नाहीत. परंतु औपचारिक पूर्वप्राथमिक शिक्षण फार खर्चाचे असते आणि आपल्यासारख्या गरीब देशाला तर ते परवडणे अशक्य कोटीतीलच आहे. आपल्याकडे बालशिक्षणाचा एकच मार्ग उपलब्ध होऊ शकतो. लिहितावाचता येणाऱ्या पालकांच्या हाती बालकांना उपयुक्त गीते व कथा पुष्कळ प्रमाणात व सातत्याने दयाव्यात आणि प्राथमिक शिक्षकांच्या हातीदेखील हे साहित्य देऊन प्रत्येक प्राथमिक शाळेत निदान एक गाणी-गोष्टी ऐकण्याचे बालकेंद्र त्यांनी सुरू करावे यासाठी त्यांना उत्तेजन दयावे. या दृष्टिकोनातून शिक्षणशास्त्र संस्थेमध्ये एक विशेष अभ्यास-गट नेमण्यात आला आणि त्याच्या साह्याने बालगोष्टी व बालगीते संकलित करण्यात आली. त्यांचे संपादन व छपाई यांची जबाबदारी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाने मोठ्या हौसेने उचलली. ज्या आकर्षक स्वरूपात पाठ्यपुस्तक मंडळाने हे बालगोष्टींचे व बालगीतांचे संग्रह प्रकाशित केलेले आहेत त्याबद्दल मंडळाचे आभार मानावे तेवढे थोडेच. पालकांकडून आणि शिक्षकांकडून या संग्रहांचे स्वागत होईल अशी खात्री वाटते. परंतु लहान मुलांच्या मोठ्या भावंडांच्या हाती जर हे संग्रह दिले आणि प्राथमिक शाळांतून वरच्या वर्गातील विदयार्थ्यांकडे देखील हे संग्रह देऊन या सर्व वडील भावंडांनी आपल्या लहानग्या भावाबहिणींना त्यांतील गोष्टी वाचून दाखवल्या आणि बडबड गीते शिकवली तर त्या सर्वांचा भाषाविकास तर होईलच पण मायेची बंधनेदेखील अधिक दृढ होतील. हा प्रयोग शक्य तितक्या पालकांनी व शिक्षकांनी करून पाहावा अशी त्यांना विनंती आहे. ज्या देशाकडे औपचारिक बालवाड्या व शिशुमंदिरे काढण्यासाठी आर्थिक सामर्थ्य नाही त्याला परस्परप्रेमाच्या सामर्थ्यावरच बालविकासाचे व बालशिक्षणाचे प्रश्न सोडवावे लागणार आहेत.

पुणे :
दिनांक : १४ नोव्हेंबर, १९७५

चित्रा नाईक
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य

प्रथमावृत्ती : १९७५

पुनर्मुद्रण : १९८७

मुद्रणादेश : PO-TB ५२७/८७-८८ (०-०२)

कागद : ६१ × ८६ सेमी. ६०/ग्रॅ. व. मी. व्हाईट प्रिंटिंग

मुद्रक : तारापोरवाला पब्लिशिंग इंडस्ट्रीज प्रा. लि. मुंबई-400018

प्रकाशक : श. वा. वेलणकर नियंत्रक, पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ वरळी, मुंबई

ह्या पुस्तकाचा कागद महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याने सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिला आहे.

अनुक्रमणिका

क्रमांक		पृष्ठ क्र.

अभिनय गीते

क्रमांक		पृष्ठ क्र.

खेळगीते

कूचगीते

१. येग येग सरी

येग येग सरी
माझं मडकं भरी
सर आली धावून
मडकं गेलं वाहून.

२. दिन दिन दिवाळी

दिन दिन दिवाळी
गाई म्हशी ओवाळी
गाई म्हशी कुणाच्या ?
लक्ष्मणाच्या.
लक्ष्मण कुणाचा ?
आई-बापाचा.

३. हात कसा हाले

हात कसा हाले
शेजी कसा चाले
वारा पाऊस येतो
जोंधळा लवे.

४. चाल चाल माते

चाल चाल माते
पायी भरले काटे
आजोळीच्या वाटे
मामा भेटे.

५. इथं इथं बस रे मोरा

इथं इथं बस रे मोरा
बाळ घाली चारा
दाणा खा, पाणी पी
भुर्र्रदिशी उडून जा.

६. इथं इथं बस रे काऊ

इथं इथं बस रे काऊ
बाळ घाली जेवू
इथं बस, तिथं बस
बाळाच्या डोक्यावर
भुर्र्र उडून जा.

७. पाय जो मोडला

पाय जो मोडला
पायावरून गाडा गेला
लंगड्या पायी झगडा केला
दे रे मामा घोडा मला
जाऊ दे वऱ्हाडाला.

८. लव लव साळुबाई

लव लव साळुबाई
मामा येतो
हाती खोबऱ्याची
वाटी देतो
मामी येते गूळ देते.

९. अडगुलं मडगुलं

अडगुलं मडगुलं
सोन्याचं कडगुलं
रुप्याचा वाळा
तान्ह्या बाळा
तीट लावू.

१०. टाळ्या पोळ्या पुरणाच्या

टाळ्या पोळ्या पुरणाच्या
भांड्यात भरून ठेवायच्या
सकाळी उठून खायच्या
सगळ्यांना दयायच्या.

११. घमर घमर

घमर घमर छास बिलोरे
छासणीको छोरो रोवे
रोवे तो रोवंदे
माको छास बिलोवंदे.

१२. आकण माकण

आकण माकण
सोन्याचं काकण
आमच्या बाळाला
देवाची राखण.

१३. उगी बाई उगी

उगी बाई उगी
चोळी शिवीन मुगी
परकर शिवीन लाल
सासरी धाडीन काल
कालचा दिवस येईना
बाळ सासरी जाईना.

१४. हात ग हरकुली

हात ग हरकुली
बाळाच्या काखेत कुरकुली
बाळ गेला फुलाला
हाका मारी मुलाला.

१५. डोल बाई डोलाची

डोल बाई डोलाची
काखेत परडी फुलांची
फुलं गेली सांडून
मुलं आली भांडून.

१६. चांदोबा चांदोबा टोपी दे

चांदोबा चांदोबा टोपी दे
आज नाही बाळा उद्या ये.

१७. गिर गिर गिरकी

गिर गिर गिरकी
    ताकाची फिरकी
लोण्याच्या गोळा
    गड गड गडप्

१८. अक्कणमाती

अक्कणमाती चिक्कणमाती
चिखलात फसले दोन हत्ती
हत्ती केवढे जाडजूड !
डोंगराएवढे मोठ्ठे धूड !!

—राजा मंगळवेढेकर

१९. चांदोबा चांदोबा भागलास का?

चांदोबा चांदोबा भागलास का ?
लिंबोणीच्या झाडामागे लपलास का ?

लिंबोणीचे झाड करवंदी
मामाचा वाडा चिरेबंदी

मामाच्या वाड्यात येऊन जा
तूप–रोटी खाऊन जा

तुपात पडली माशी
चांदोबा गेला उपाशी.

२०. फळांचा राजा

नाशिकची द्राक्षं गोडच गोड
नागपूरच्या संत्र्याची छानदार फोड

वसईच्या केळ्याचा मोठा मान
केळ्याची शिकरण लागते छान

पनवेलचे कालिंगड लालच लाल
खाऊन पहाल तर खूषच व्हाल

अमदाबादची बोरं हिरवी गार
लई-लई सस्ती पैशाला चार

पुरेत गप्पा तुम्ही थांबा
फळांचा राजा मी आंबा.

२१. ससा रे ससा

ससा रे ससा दिसतो कसा?
कापूस पिंजून ठेवलाय जसा!
    लाल लाल डोळे छान
    छोटे शेपूट मोठे कान
गवत खाऊन फुगतो डुम्म
चाहूल लागता पळतो धुम्म।

२२. इवलासा गड्डू

इवलासा गड्डू – त्यावर लाडू
कोणी नका पाडू – कोणी नका काढू
बाळ लागला रडू – बाळ लागला चढू
बाळाने काढला गड्डू – खाऊन टाकला लाडू.

—सरला देवधर

२३. नक्को नक्को

रिकामं बसणं
नक्को नक्को ।
आजारी पडणं
नक्को नक्को ।
कडू कडू औषध
नक्को नक्को ।
चहाचा कप
नक्को नक्को ।
रागाचं बोलणं
नक्को नक्को ।
खोटं खोटं सांगणं
नक्को नक्को ।
काठीनं मारणं
नक्को नक्को ।
गोड गोड खाऊ हवा ?
हो, हो, हवाच हवा !

– ताराबाई परांजपे

२४. आळी मिळी

आळी मिळी गुपचिळी
      गुपचुप गुपचुप बसतं कोण?
त्याला द्यायचे पेढे दोन
      पेढे घ्या पेढे, सातारी पेढे
घेणार नाहीत ते अगदीच वेडे.

—ताराबाई परांजपे

२५. बागुलबुवा नाहीच

गुपचुप गुपचुप बागुलबुवा बोले
      कानापाशी बोले,
      घड्याळातले ऐका टोले ॥ धृ० ॥
सात वाजले, दिवे लागले, झोपा आता सगळे सगळे
काळी काळी, रात्र झाली, कोण झोपले, कोण जागले
बागुलबुवा पाही, बाळे सगळी, झोपी गेली, झोपी गेली,
            बागुलबुवा नाही न् काही नाही!

२६. चुट् चुट् चुटकी

चुट् चुट चुट्की
घेऊ गिरकी

    गिरकी गोल
    पाणी खोल

गिरकी गरगर
पाणी वरवर

    पाण्यात बोर
    पडलं टपकन्

गिरकी आली
खाली धपकन् !

— सरिता पदकी

२७. टाळ्या टाळ्या

टाळ्या टाळ्या
पुरणाच्या पोळ्या
        टाळ्या टाळ्या
        गुळाच्या पोळ्या
टाळ्या टाळ्या
खव्याच्या पोळ्या
        टाळ्या टाळ्या
        लिमलेटच्या गोळ्या
टाळ्या टाळ्या
औषधाच्या गोळ्या
        कडू कडू कडू ऽ ऽ ऽ
        पाहिजेत का ? पाहिजेत का ?
नक्को नक्को ऽ ऽ ऽ
औषधाच्या गोळ्या
        नक्को नक्को ऽ ऽ ऽ
        लिमलेटच्या गोळ्या

पाहिजे पाहिजे
सर्वांना पाहिजे, सर्वांना पाहिजे.

२८. एक मोठा डोंगर

एक मोठा डोंगर, डोंगरावर झाडे, हिरवळ बाजूला
हिरवळ बाजूलाच होती, हिरवळ बाजूला
एक मोठा डोंगर, डोंगरावर झाडे
झाडांना फांद्या, हिरवळ बाजूला
हिरवळ बाजूलाच होती, हिरवळ बाजूला
एक मोठा डोंगर, डोंगरावर झाडे,
झाडांना फांद्या, फांद्यांना पाने, हिरवळ बाजूला
हिरवळ बाजूलाच होती, हिरवळ बाजूला
एक मोठा डोंगर, डोंगरावर झाडे
झाडांना फांद्या, फांद्यांना पाने,
पानांत घरटे, हिरवळ बाजूला
हिरवळ बाजूलाच होती, हिरवळ बाजूला
एक मोठा डोंगर, डोंगरावर झाडे,

झाडांना फांद्या, फांद्यांना पाने
पानांत घरटे, घरट्यात पक्षी, हिरवळ बाजूला
हिरवळ बाजूलाच होती, हिरवळ बाजूला
एक मोठा डोंगर, डोंगरावर झाडे,
झाडांना फांद्या, फांद्यांना पाने,
पानांत घरटे, घरट्यात पक्षी,
पक्षांची पिल्ले, हिरवळ बाजूला
हिरवळ बाजूलाच होती, हिरवळ बाजूला.

– सरला देवधर

२९. चला गड्यांनो जाऊ या

चला गड्यांनो जाऊ या, पट्पट् गारा वेचू या
धो धो पाउस कोसळतो, गारा कितितरि हा देतो
असे टोपली त्या जवळी, दूर उंच त्या आभाळी
गारांनी जणु भरलेली, घेउनि येई हा खाली
नकोत चिंचा बोरे ती, गारा आम्हां आवडती
टप् टप् गारा या पडती, गारांची ही मौज किती !

– सरला देवधर

३०. घण् घण् घण् घण् घंटा वाजे

घण् घण् घण् घण् घंटा वाजे
झन् झन् झन् झन् झांज वाजे
चिप् चिप् चिप् चिप् चिपळी वाजे
ढम् ढम् ढम् ढम् ढोल वाजे
टिंग टॉंग टिंग टॉंग पियानो वाजे
सा रे ग म प ध नी सा पेटी वाजे
पी पी पी पी पिपाणि वाजे
छुम् छुम् छुम् छुम् घुंगरु वाजे.

– सरला देवधर

३१. पोपट

निळा निळा छान छान – आकाशाचा रंग
हिरवं गार हिरवं गार – पोपटाचं अंग
लाल लाल चुटुक – पोपटाची चोच
गोड गोड पेरूला – मारतो टोच.

– ताराबाई परांजपे

३२. गोष्ट गोष्ट गोठारी

गोष्ट गोष्ट गोठारी
कुंभार मडकं ठोठारी

मडकं केलं मातीचं
पाणी आणलं विहिरीचं

पाणी झालं गार गार
मुलं प्याली फार फार

घसा लागला दुखायला
डॉक्टर आले बघायला

औषध दिलं कडू कडू
मुलांना आलं फारच रडू

चॉकलेट दिलं खायला
मुलं लागली हसायला.

– ताराबाई परांजपे

३३. नाद

धा धा धीं धीं धा धा धीं धीं
तबला वाजे धा धा तीं तीं

गरगर गवई घेतो ताना
नाद घुमतसे दाहि दिशांना

सा रे ग म प ध नी सा
सूर पेटिचा वाजे कैसा

सतार वाजे दिडदा दिडदा
लक्ष लावुनी ऐका नादा

छुनुक छुनुक छुन् घुंगुर वाजे
तालावरती राधा नाचे

सारे मिळुनी हात धरू या
छुम् छुम् छुम् छुम् नाच करू या.

३४. खाउन टाका मटामटा

तांदुळ घ्या हो पसा पसा
धुऊन टाका खसा खसा
भात शिजेल रटा रटा
खाउन टाका मटामटा

पीठ चाळा सरासरा
कणीक भिजवा भराभरा
लाट्या करा गरागरा
पुऱ्या लाटा सरासरा
तळून काढा पटापटा
खाउन टाका मटामटा.

मटकी घ्या भिजत टाका
दुसऱ्या दिवशी उपसून टाका
मटकिला येतिल मोडच मोड
उसळ लागेल गोडच गोड
वास सुटेल घम् घम्
खायला लागेल चमचम्.

३५. रस्ते साफ, घरे साफ

रस्ते साफ, घरे साफ
सगळीकडे साफ साफ-
रस्त्यांत घाण टाकायची नाही
घरांत घाण ठेवायची नाही
बागेत घाण करायची नाही
स्टेशनवर ? उं ऽऽ हूं
फुटपाथवर ? उं ऽऽ हूं
अंगणामध्ये ? उं ऽऽ हूं
सिनेमा गृहात ? उं ऽऽ हू
सभागृहात ? उं ऽऽ हू
मग कचरा कुठे टाकणार ? टोपलीमध्ये
रद्दी कागद ? टोपलीमध्ये
टोपली केराने भरली तर ?
रस्त्यावरच्या डब्यामध्ये
डबा केराने भरला तर ?

म्युनिसिपालटीच्या गाडीमध्ये
गाडी केराने भरली तर ?
गाडीतला कचरा दूर नेतात
दूर नेऊन जाळून टाकतात
दूर नेऊन पुरून टाकतात
आपली घरे साफ होतात
आपले रस्ते साफ होतात
आपली गावे साफ होतात
रस्ते साफ, घरे साफ
सगळीकडे साफ साफ.

– सरला देवधर

३६. छोटा छोटा चेंडू

छोटा छोटा चेंडू, रंगीत रंगीत दांडू
बंडू खेळतो गमतीने, दांडू मारला जोराने
चेंडू लागला धावायला, बंडू लागला पकडायला
धाव धाव धावला, पाय घसरून आपटला
पडता पडता सापडला, एकदम चेंडू पकडला ।
चेंडू घेतला पटकन्, बंडू हसला खुदकन् ।

३७. भुड भुड भुडुश्शो

भुड् भुड् भुडुश्शो
आंघोळ करुश्शो
आंघोळ केऽली
पाण्यानं नेऽली

पाणी गेऽलं
दारच्या केळीला
हिरव्या वेलीला
घरच्या चिऊला
वरच्या काऊला
घुम् घुम् पारव्याला
झुळ् झुळ् गारव्याला!

बाळ झाऽलं गोरं गोऽरं
पाहयला आली पोरं थोऽरं
लावली तीट
मिटली मूठ
मोत्याचं टोपलं
बाळ तर झोपलं!

– सरिता पदकी

३८. एक होती सुई

एक होती सुई, तिच्यामागे सदा घाई
दोरा घेऊन धावायची, छान छान कपडे शिवायची
शिवून शिवून दमायची, दमून भागून निजायची
एकदा सुई कंटाळली, सतरंजीवर झोपी गेली
सुईवर पडला ताईचा पाय, ताईनं केलं हाय हाय
सुईला वाटली भीति फार, ताई आता देइल मार
सुई पटकन् पळाली, कपाटात जाऊन लपली
दोऱ्यात जाऊन घुसली, गुपचुप जाऊन निजली.

– ताराबाई परांजपे

३९. कोण बरं ती ?

पों पों करते सर सर पळते
कोण बरं ती ?
मोटरगाडी आमचीच ही

झुक झुक करते रुळावर धावते
कोण बरं ती ?
आगीनगाडी आमचीच ही

भरारी मारत आभाळात फिरतं
कोण बरं ते ?
बोइंग विमान आमचंच हे.

– ताराबाई परांजपे

४०. झोपाळा

झू झू झोपाळा
नेऊ चला आभाळा

झोक्यावर बसू
खुदुखुदु हसू

झोका चढे झरझर
वारा येई भरभर

झोका जाई उंच
हाती येई चिंच

गाऊ छान गाणी
बाळ आपला गुणी.

—राजा मंगळवेढेकर

४१. चकचक चकली

चकचक चकली – काट्याने माखली
तुकडा मोडताच – खमंग लागली
कडकड कडबोळे – कुडकुडीत झाले
एकच खाताना – दात दुखू लागले
गोरीपान करंजी – होडीसारखी दिसते
एकच खाताच – आणखी हवी वाटते
एवढा मोठा लाडू – हातातसुद्धा मावेना
थोडा थोडा खाताना – केव्हा संपला कळेना.

४२. खाऊचे गाणे

गोड गोड रसगुल्ले चाखलेत का ?
बंगाली मेवा खाऊन म्हणाल, 'अहा !'
सुरतेची बर्फी लज्जतदार
चव घेऊन बघाल तर व्हाल गार
आमच्या मद्रासला केव्हा याल ?
इडली डोसा खाऊन केव्हा जाल !
मथुरेची जिलेबी म्हणते ऐकलंत का ?
माझ्यावाचून तुमचं लग्न होईल का ?
धारवाडी पुरणपोळी नि साजुक तूप
खाऊन तरी पहा आपलं आरशात रूप
नारळाचे मोदक चाखलेत तर !
कोकणात होईल कायमचं घर !

४३. आजीचा स्वयंपाक गोडच गोड

एक होत्या आजीबाई, स्वयंपाकाची त्यांना घाई
वेळ झाली जेवायची, गर्दी जमली मुलांची
वसंत आला, जयंत आला, कमल आली, विमल आली
मुलांना लागली फारच भूक, भाकरी भाकरी लवकर फूग
आजीची भाकरी फुगली, मुलं हसू लागली
आजी आजी वाढ वाढ, 'ताकातलं लोणी काढ काढ
ताकातलं लोणी काढलं, भाकरीवर वाढलं
भाजी केली मेथीची, चटणी केली कवठाची
कढी केली ताकाची, उसळ केली मटकीची
मटकीला आले मोडच मोड, आजीचा स्वयंपाक गोडच गोड.

– ताराबाई परांजपे

४४. कोण कोण काटेरी ?

सांगा पाहू कुणीतरी । कोण कोण आहे काटेरी ?
खमंग चकली वाटोळी । काटेरी हो काटेरी

सांगा पाहू कुणीतरी । कोण कोण आहे काटेरी ?
करंजीची चंद्रकोर । काटेरी हो काटेरी

सांगा पाहू कुणीतरी । कोण कोण आहे काटेरी ?
निवडुंगाची बोंड लाल । काटेरी हो काटेरी

सांगा पाहू कुणीतरी । कोण कोण आहे काटेरी ?
एवढा मोठा फणस पहा । काटेरी हो काटेरी

सांगा पाहू कुणीतरी । कोण कोण आहे काटेरी ?
हलवा आमुचा गोड गोड । काटेरी हो काटेरी ॥ सांगा पाहू ॥

४५. लाह्या

फट फट् फट्, चट् चट् चट्,
लाह्या घ्या लाह्या, जोंधळ्याच्या लाह्या
लाहीचे पीठ आजीला द्या
फोडणीच्या लाह्या आम्हांला द्या
लाह्या घ्या लाह्या, साळीच्या लाह्या
निवडून पाखडून, बाळाला द्या
भातुकलीसाठी, आम्हांला द्या
लाह्या घ्या लाह्या, राजगिऱ्याच्या लाह्या
उपासाच्या दिवशी आईला द्या
गोड गोड लाडू आम्हांला द्या.

– ताराबाई परांजपे

४६. सुपलीबाई, सुपलीबाई–

सुपलीबाई, सुपलीबाई, काय करता ?
अनिल जेवायचाय, शीला जेवायचीय
गहू मी पाखडते भराभरा

जातेराव, जातेराव, काय करता ?
अनिल जेवायचाय, शीला जेवायचीय
गहू मी दळतो भराभरा

चाळणीबाई, चाळणीबाई, काय करता ?
अनिल जेवायचाय, शीला जेवायचीय
पीठ मी चाळते भराभरा

लाटणेराव, लाटणेराव, काय करता ?
अनिल जेवायचाय, शीला जेवायचीय
पोळ्या मी लाटतो भराभरा

तवेराव, तवेराव, काय करता ?
अनिल जेवायचाय, शीला जेवायचीय

पोळ्या मी भाजतो भराभरा
आजीबाई, आजीबाई, काय करता ?
अनिल जेवायचाय, शीला जेवायचीय
पोळ्यां मी वाढते भराभरा
अनिलराव शीलाबाई, काय करता ?
शाळेत जायचंय, खूप खेळायचंय
पोळ्या आम्ही खातो भराभरा.

४७. मज्जा

आई ग आई खाऊ दे काही
आईने दिला लाडू तो कसा फोडू ?
एक लाडू खाल्ला घशामध्ये अडकला
घशाखाली उतरेना, बाहेर पण निघेना
ताई आली धावून दिली बुक्की ठेवून
लाडू पडला खाली अशी मज्जा झाली.

४८. एक होत्या आजी

एक होत्या आजी
चिरीत होत्या भाजी
भाजी चिरली खसाखसा
तांदुळ धुतले पसापसा
भाजी शिजली रटारटा
मुलं जेवली मटामटा

मुलं गेली खेळायला
धावायला नि पळायला
खेळून खेळून दमली
घरी जाऊन निजली.

– सरला देवधर

४९. एक होता नंदू

एक होता नंदू, एक होता चंदू

नंदू आणि चंदू करतात काय ?
डावा उजवा, डावा उजवा दुसरं काय ?

नंदू चंदू खेळतात काय ?
लढाई लढाई दुसरं काय ?

नंदू चंदू खातात काय ?
दूध पोळी दुसरं काय ?

नंदू चंदू दिसतात कसे ?
छोटे जवान दिसतात जसे !

५०. ताई

ताई माझी छान छान
गोरी गोरी पान पान
    लाल परकर हिरवी चोळी
    वेणीला रिबिन पिवळी पिवळी
कानांत डूल मोत्यांचे
घुंगुर पायांत चांदीचे
    छुम् छुम् छुम् छुम् तालात चाल
    खळ्यांनी भरले हसरे गाल
लुक्लुक् डोळे निळेशार
इवल्या ओठांची वटवट फार.
    लाललाल टिकली वर्खाची
    गालावर खूण तिळाची
आमची ताई छान छान
जसं काही केतकीचं पान

– वसुधा पाटील

५१. खूप खूप हसा

गुबगुबीत ससा
सांगतोय कसा
मुलांनो तुम्ही
खूप खूप हसा

गाडीभर गवत
हत्ती करी गट्ट
ज्याला त्याला सांगे
खूप व्हा लठ्ठ

– जयवंत यळगुडकर

५२. कोण? कोण?

पहाट झाली – सांगतं कोण?
कुकुऽच् कोंबडा – आणखी कोण?

उठा उठा लवकर – सांगतं कोण?
विठू-विठू पोपट – आणखी कोण?

ताजं-ताजं दूध – देतं कोण?
गोठ्यातली हम्मा – आणखी कोण?

चोरून दूध – पितं कोण?
म्यॉंव-म्यॉंव माऊताई – आणखी कोण?

घराची राखण – करतं कोण?
भू-भू कुत्रा – आणखी कोण?

बागेतली भाजी – खातं कोण?
मऊमऊ ससेभाऊ – आणखी कोण?

५३. जरदाळू

टप् टप् पाऊस पऽडला
राघू झाडात दऽडला

सर् सर् सरी आऽल्या
गाई घरी गेऽल्या

झुळ झुळ वाहिलं पाऽणी
नदी गाते गाऽणी

नदीला आला पूऽर
मामाचा वाडा दूऽर

मामा मोठा मायाऽळू
खायला देतो जरदाऽळू !

– राजा मंगळवेढेकर

५४. येग येग

येग येग सरी
ये माझ्या घरी
ये गडे लवकर
देईन मी तुला माझा नवा परकर
येग येग खारी
ये माझ्या दारी
ये मारून उडी
देईन तुला अर्धी चॉकलेटची वडी
येग येग माऊ
दोघी मिळून जाऊ
भितेस की काय ?
देईन तुला दूध मऊ मऊ साय !

– मंगेश पाडगावकर

५५. ये रे ये रे पावसा

ये रे ये रे पावसा
तुला देतो पैसा
पैसा झाला खोटा
पाऊस आला मोठा

पाऊस पडला झिम् झिम्
अंगण झालं ओलंचिंब
पाऊस पडतो मुसळधार
रान होईल हिरवंगार

येग येग सरी
माझं मडकं भरी
सर आली धावून
मडकं गेलं वाहून

५६. नारळी

मी कोण आहे ओळखलं का ?
हो हो ओळखलं 'नारळाचं झाड'
नारळाच्या झाडाला कोणी म्हणतात 'माड'
आम्ही खाऊ खोबरं, आम्ही पिऊ पाणी
पात्यांच्या झावळ्या, झावळ्यांच्या झोपड्या
करवंटीचे ओळक, हिरकुटाची झाडू
राहिलं साहिलं, चुलीत घालू.

– सरला

५७. भाजी

अटोळा गटोळा
भोपळा वाटोळा

लांबोळी वेटोळी
पडवळ सापोळी

नाजुक साजुक
चवळीच्या शेंगा

देवधर

निळ्या नि जांभळ्या
वांग्याच्या रांगा

टोपलीत बसुन, कुठं निघाला ?
जातोय गावच्या बाजाराला !

– शैलजा राजे

५८. कोशिंबीर

कोवळ्या कोवळ्या
काकड्या आणल्या
सर्वांनी मिळून
बारीक चिरल्या
मीठ घातलं
खोबरं घातलं
दाण्यांचं त्यात कूट घातलं
आणिक त्यावर लिंबू पिळलं
चिरलेली काकडी कालवली
आणि—
मिटक्या मारीत खाल्ली

– सरला देवधर

५९. अगदी छोट्यांसाठी

कोवळी कोवळी काकडी घ्या
ताजी ताजी काकडी

दहा पैसे पंधरा पैसे हिरवीगार काकडी
ताईला द्या आणि दादाला द्या
आई बाबांसाठी घेऊन जा

कोवळी कोवळी काकडी घ्या
ताजी ताजी काकडी घ्या

– सरला देवधर

६०. बागेत येऊन जा –

झाडांची गंमत, ऐका हं जंमत ।
मोठ्या बोरीचं छोटंसं पान ।
छोट्या केळीचं मोठं पान ।
मोठ्या बकुळीचं छोटसं फूल ।
छोट्याशा झेंडूचं मोठं फूल ।
मोठ्या फणसात छोटी बी ।
छोट्या पोफळात मोठी बी ।
अशी आहे गंमत ।
    आमच्या बागेत येऊन जा ।
    गंमत जंमत पाहून जा ।

– ताराबाई परांजपे

६१. पावसा पावसा

पावसा पावसा सरसर ये
पावसा पावसा भरभर ये

सरीमध्ये नाचू दे
ओलांचिंब होऊ दे
होडी माझी बनवू दे
होडी घेउन खेळू दे.

होडी माझी शिडाची
सुरु सुरु चालायची
होडी माझी बंबाची
दूर देशा निघायची.

चला सारे गावाला
या रे सारे हिंडायला
दूर दूर भटकायला
पावसामध्ये नाचायला

पावसा पावसा सरसर ये
पावसा पावसा भरभर ये.

— सुमती पायगावकर

६२. थेंबा थेंबा –

थेंबा थेंबा थांब थांब
दोरी तुझी लांब लांब ।
आकाशात पोहोचली । तिथे कशी खोचली ।
सर सर सर सर धावतोस । सरी वर सरी गुंफतोस ।
सरी तुझ्या मोत्यांच्या । रुप्याच्या की सोन्याच्या ।
सरी तुझ्या ओल्या । गंगेत जाऊन न्हाल्या ।

– ताराबाई मोडक

६३. पाऊस आला

पाऊस आला सड् सड्
पाखरांनी केली फड् फड्
पाऊस आला झिम् झिम्
मुलं झाली ओली चिंब
पाऊस आला धो धो
ओढे करती घो घो

– सरला देवधर

६४. रंगीत फुगे

रंगीत फुगे
बघा बघा हे!
चढले वाऱ्यावर
चालले ढगांवर
एक छान डोलतो
एक मान मोडतो
एक मागे राहतो
एक पुढे पळतो
चौघेजण मिळून
चालले उंच उडून
पहा त्यांचा रुबाब
वाऱ्यावरचे नवाब
बघा बघा हे
रंगीत फुगे!
रंगीत फुगे!!
रंगीत फुगे!!!

—राजा मंगळवेढेकर

६५. पाऊस

काळ्या काळ्या ढगांतून
पाऊस आला लपून छपून
पावसा पावसा ये ये
हातावर टाळी दे दे
टप् टप् थेंब पडू दे
अंग माझं भिजू दे
आल्या रे आल्या सरी सरी
पळा रे पळा घरी घरी

— ताराबाई परांजपे

६६. एक सुई दे —

चांदोमामा, चांदोमामा, मला एक सुई दे.
सुई कशाला ?
पिशवी शिवायला.
पिशवी कशाला ?
पैसे ठेवायला.

पैसे कशाला ?
    हत्ती घ्यायला.
हत्ती कशाला ?
    अंबारीत बसायला.

६७. तट्टम् लठ्ठम्

चांदोबा चांदोबा
होतास रोड
पेरूची फोड
    झालास कसा
    वाटोळा वाटोळा
    बाळाचा जसा
    भाताचा थाळा
बाळानं आपला
सोडला हट्ट
आईनं दिलेलं
दूध केलं गट्ट
फुगलो तट्टम्
झालो लठ्ठम् !

– सरिता पदकी

६८. ड्रांव ड्रांव

आभाळ वाजलं	धडाड् धुम्
वारा सुटला	सू सू सुम्म्
वीज चमकली	चक् चक् चक्
जिकडे तिकडे	लख् लख् लख्
पाऊस आला	धो धो धो
पाणी वाहयलं	सो सो सो
पाण्यात बोट	सोडली सोडली
हातभर जाऊन	बुडली बुडली
बोटीवर बसला	बेडुक बेडुक
तो ओरडला	ड्रांव् डुक् ड्रांव् डुक्

– सरिता पदकी

६९. चणे घ्या चणे !

चणे घ्या चणे !
छान छान भाजलेले
तिखट मीठ लावलेले
आंबट लिंबू पिळलेले
चणे घ्या चणे !

माझे चणे खाणारा
होईल दणकट खेळणारा
नाही हरणार कुणाला
चणे घ्या चणे !

थोडे घ्या चाखायला
पळा सांगा आईला
'आला आला चणेवाला'
चणे घ्या चणे !

—श्रीपाद डोंगरे

७०. नट्टापट्टा

साळीदादा, साळीदादा,
एवढं माझं ऐकशील का ?
जरीचा काठ
बुट्ट्यांचा थाट
साडी निळी मला विणशील का ?

सोनारदादा, सोनारदादा,
एवढं माझं ऐकशील का ?
घुंघरांची रुणझुण
साखळीची किण्‌किण्
कंबरपट्टा मला घडवशील का ?

माळीदादा, माळीदादा,
एवढं माझं ऐकशील का ?
चाफ्याची कळी
शेवंती पिवळी
गजरा मला गुंफशील का ?

कासारदादा, कासारदादा,
एवढं माझं ऐकशील का ?
गोरं गोरं अंग
लाल लाल रंग
बांगड्या मला भरशील का ?

साडी नेसेन चटाचटा
करीन मग मी नट्टापट्टा
कमरेला घालीन कंबरपट्टा
वेणीत गजरा पिवळा धमक
हातात चुडा लालभडक
लोक बघतील टकमक टकमक

–शांता शेळके

७१. चेंडूशी खेळू तू आणि मी

मोत्या ए मोत्या,
तुझ्यासाठी आईनं दिल्या आहेत
जाड जाड चपात्या
आतबाहेर फेऱ्या घालतोस
केव्हापासून जिभल्या चाटतोस
चपाती खा, तू पाणी पी
चेंडूशी खेळू तू आणि मी.

– सरला देवधर

७२. चिव चिव चिमणी –

चिव चिव चिमणी एवढीशी
का ग बसलीस दाराशी?
मांजर येईल तिकडून
खाईल तुला पकडून.

७३. तुलाच देतो खाऊ –

मनी माऊ मनी माऊ
हा बघ आणलाय
तुझ्यासाठी खाऊ
म्यॉंव म्यॉंव करतेस
पायात घोटाळतेस
सारखी सारखी खाऊ मागतेस
खाऊ देतो तुला
बोचकारू नकोस मला

—सरला देवधर

७४. जादूगार पोपट –

पोपट पोपट मिठ्ठूमिया
फोडून खाई मिरचीच्या बिया
तिखट खातोस गोड बोलतोस
अशी कशी रे जादू करतोस ?

– प्रमिला बेडेकर

७५. कोकरू –

पांढरं पांढरं छान छान
कोकरू आहे गोरं पान
कापसासारखं मऊ मऊ
हातात धरून चल पाहू,
उड्या मारित टुण्टुण्
कोकरू गेलं दूर पळून.

७६. गाई, गाई !

गाई, गाई, दूध दे !
दूध दिलं वासराला
वासरा वासरा बळ दे
बळ दिलं नांगराला
नांगरा नांगरा फाळ दे
फाळ दिला जमिनीला

जमिनी जमिनी कस दे
कस दिला कणसाला
कणसा कणसा धान्य दे
पसा पसा भरून घे !

–राजा मंगळवेढेकर

७७. चल रे घोड्या –

चल रे घोड्या चक् चक्
पळ रे पळ टप् टप्
घोडा करतो फुरफुर
जाऊ म्हणतो दूर दूर
घोडा जातो दौडत
घरदार गर्जत
चल रे घोड्या चक् चक्
पळ रे पळ टप् टप्

–राजा मंगळवेढेकर

७८. ससेभाऊ ससेभाऊ –

ससेभाऊ ससेभाऊ
चार उड्या मारा पाहू
कशा कशा कशा ?
अशा अशा अशा !
    अहो अहो हत्ती !
    डुलडुलता कित्ती !
    कसे कसे कसे ?
    असे असे असे !
मुंगीताई मुंगीताई
तुरू तुरू तुमची घाई
कशी कशी कशी ?
अशी अशी अशी !
    अहो अहो गाढवदादा
    जरा तुमचा सूर काढा
    कसा कसा कसा ?

असा असा असा
हाँ ऽ हाँऽ हाँ ऽऽऽ ।

– सरिता पदकी

७९. मोरा, मोरा –

मोरा, रे मोरा
काय तुझा तोरा !
रंगीत पिसारा
डोक्यावर तुरा
बघ वर बघ
आले आले ढग
एक पाय दुमडून
पिसारा उघडून
नाच तर खरा
मोरा, रे मोरा !

८०. इटुकली मिटुकली –

इटुकली मिटुकली
खार कशी धिटुकली !
झाडावर चढे भरभर
खाली उतरे झरझर !
ऐटीत दोन पायांवर
बसून राहते क्षणभर !
सुरेख शेपुट झुबकेदार
डोळे कसे पाणीदार !
खाई दाणा कुरूकुरू
चाले कशी तुरूतुरू !
जीव तर एवढासा
नखरा पण पहा कसा !

– श्रीपाद डोंगरे

८१. गंमत

लाल तुऱ्याचा लठ्ठ कोंबडा
कसा आरवे, कुकूच कूऽ
आंब्यावरती बसुनि कोकिळा
कशी गातसे कुहूऽकुहूऽ
फांदीवरती काळा कावळा
कसा ओरडे काव काव
ओटीवरती नाचत चिमणी
कशी बोलते चिव चिव चिव
पिंजऱ्यातला पोपटदादा
कसा बोलतो गोड गोड
भूक लागली मला हवी हो
एक पेरूची फोड फोड.

– मा. गो. काटकर

८२. एक होता ससा

एक होता ससा, त्याला सापडला पैसा
पैसा घेतला डोक्यावर, पळू लागला भराभर

तिकडून आली चिऊताई, हळूच पैसा उचलून घेई
झाडावर गेली उडत, ससा बसला रडत

चिमणीला आले हसू, हे रे काय ससू ?
हा घे पैसा, बघू खेळतोस कसा ?

पटकन् खाली टाकला, टपकन् आवाज आला
त्या आवाजाने घाबरून, ससोबा गेले हादरून
झुडपात बसले दडून, अन् पैसा राहिला पडून.

८३. वानर वानर हुप्

वानर वानर हुऽप्
तुझ्या शेपटीला शेरभर तूप !
वानर चढले झाडावर
मुले जमली पारावर
उड्या मारी टण् टण्
छप्पर वाजे दण् दण्
तोंड काळे काळे कुट्ट
लांबच लांब हाले शेपूट
वानर दावी वाकुल्या
मुलांना होती गुदगुल्या
वानर वानर हुऽप्
तुझ्या शेपटीला शेरभर तूप !

—राजा मंगळवेढेकर

८४. कुकुच्कू

कुकुच्कू आरवतो कोंबडा
तुरा हालवतो तांबडा तांबडा
कुक् कुक् करतो
दाणे टिपतो
झुंज खेळतो
पिसे फुलवतो
रुबाब याचा बडा बडा!
डौलात चालतो
निरखून पाहतो
पहाटे उठतो
मोठ्याने आरवतो
कुकुच्कू आरवतो कोंबडा.

— राजा मंगळवेढेकर

८५. एक होती खार

एक होती खार, तिला भेटली घार
दोघी गेल्या रानात, लपून बसल्या पानात
तिथून आला ससा, भित भित कसा
रंग याचा छान, गोरा गोरा पान
घार म्हणाली ससेभाऊ, जरा इकडे या पाहू
तुम्ही राहता बिळात, मी उडते आकाशात
गप्पा सप्पा खूप झाल्या, चार घटका मजेत गेल्या
आता झाली आपली गट्टी, इतक्यात वाजली शिट्टी.

८६. हत्ती

हत्ती रे हत्ती
तुझी सोंड हालती
आजूला बाजूला
वरती नि खालती
गवत खातोस कसा
सोंडेने फसाफसा. — सरला देवधर

८७. हंस

हा आहे हंस
पाण्यात राहतो
पाण्यात खेळतो
होडीसारखा पोहतो
मासे छान पकडतो

पिवळी पिवळी
त्याची चोच आहे
स्वच्छ पांढरे त्याचे
अंग आहे
बाकदार त्याची
मान आहे
त्याच्या डौलदार
डुबक्या आहेत.

– सरला देवधर

८८. जिराफ

लांब लांब मान
ताठ आहे छान

अंगावर रांगोळी
पिवळ्यावर काळी

उंच उंच पाय
लहानशी शेपटी

पाणी कसा पितो ?
पाला कसा खातो ?

डोके आहे लहान
मोठे मोठे कान.

– सरला देवधर

८९. हत्ती

हा बघा हत्ती
लठ्ठम् भारती
सोंड कशी हालवतो ?
वरती नि खालती
कान त्याचे केवढे ?
मोठ्या सुपाएवढे
अन् डोळे केवढे ?
अगदी इवले इवले
पाय पहा कसे ?
खांब आहेत जसे
हत्ती किती शक्तिवान ?
खूप मोठा ताकद्वान.

– सरला देवधर

१०. सिंह

हा कोण आहे ?
वनाचा राजा
मजबूत पायांचा
गोंडेदार शेपटीचा

बारीक बारीक कमरेचा
अक्राळ विक्राळ तोंडाचा
भल्या मोठ्या आयाळीचा

जंगलात राहतो
निर्भय फिरतो
जनावरांना खातो
नि गर्जना करतो.

– सरला देवधर

११. अस्वल

काळ्या काळ्या केसांचा
गोल गोल गठ्ठा आहे

निजून उठला की
सारखा चढतो वरती
नि उतरतो खालती

लांब लांब तोंड
आणि लांब नखे

दोन पायांवर
उभा राहतो
खेळ सारे
करून दाखवतो.

– सरला देवधर

१२. वाघोबा

वाघोबा वाघोबा
तुम्ही मला आवडता
ऐटीमध्ये चालता
ऐटीमध्ये बसता
वाघोबा वाघोबा
मला असं वाटतं
तुमचे अंग पिवळे
त्यावर पट्टे काळे
कोणीतरी ब्रशाने
छान रंगवून दिले
वाघोबा वाघोबा
काय तुमची डरकाळी
तो आवाज ऐकून
बसते अगदी कानठळी.

– सरला देवधर

१३. ससा ससा दिसतो कसा

ससा ससा
दिसतो कसा
छान छान !
खातो काय ?
पान पान !
लांब लांब
कान कान
लपून गेली
मान मान
इवला इवला
लोकरीचा गोळा
त्याला फुटले
पाय पाय
हळूच बोला
भितरा ससा
टुण टुण् उडत
पळून जाय !

– सरिता पदकी

१४. चिव चिव चिमणी

चिव चिव चिमणी
गाते गाणी
बांधले घरटे,
झाले उलटे
पडले पिलू, पाहते लिलू
पिलाला हात लावला
पिलाने हात चावला
लिलू लागली रडायला
आई समजूत घालायला
लाडू दिला खायला
लिलू लागली हसायला.

९५. शेपट्या

उंदराची शेपटी वळवळते
मांजराची शेपटी घोटाळते
कुत्र्याची शेपटी वाकडी
उंटाची शेपटी तोकडी
गाईची शेपटी गोंडेदार
सशाची शेपूट घोसदार
वानराची शेपूट फारच लांब
वाघाची शेपूट त्याहून लांब
घोड्याची शेपूट केसाळ
खारीची शेपूट ऐटदार. - सरला

९६. प्राणी दोस्त

हा आहे कुत्रा
मुळी नाही भित्रा
भोंभों भुंकतो
घरे सांभाळतो ॥ १ ॥

हा आहे उंदीर
बिळामध्ये राहतो
अंधार होताच
घरभर हिंडतो ॥ २ ॥

ही आहे हम्मा
गोठ्यात राहते
तुम्हाआम्हांला
गोड दूध देते ॥ ३ ॥

ही आहे मनुताई
म्यॉंव् म्यॉंव् करते
उंदीर दिसता
गट्टम् करते ॥ ४ ॥

हा आहे पोपट
गोड गोड बोलतो
सकाळ होताच
विठ्ठ विठ्ठ करतो ॥ ५ ॥

हा आहे कोंबडा
ऐटीत चालतो
पहाट होताच
कु कू चऽकू करतो ॥ ६ ॥

हा आहे वाघोबा
जंगलात हिंडतो
डरकाळी फोडतो
दिसेल त्याला खातो ॥ ७ ॥

हे आहे गाढव
गडबडा लोळते
हॉं हॉं करते
ओझे वाहते ॥ ८ ॥

हा आहे हत्ती
डुलत डुलत चालतो
रानात राहतो
ओंडके वाहतो ॥ ९ ॥

– सरला देवधर

१७. सगळ्यांना दोन कान

असे कसे बाई कान।
याला दोन, त्याला दोन
सगळ्यांना दोन दोन
पण गमतीदारच कान।
बकरीबाईचे लोंबकळलेले
ससेभाऊचे उभारलेले
वासरूभाऊचे टवकारलेले
बघाना ते कान।
म्हैसमाइचे कणसाएवढे
हत्तीदादाचे सुपाएवढे
उंदीरभाऊचे शिंपीएवढे
पण काळेकुट्ट कान।
माझे देखील दोन कान
पण हालत नाहीत, डोलत नाहीत
आहेत बाकी मऊ मऊ
चिमुकलेच नि छान।

– सुमती पायगावकर

१८. मनी

मनी कशी गोजिरवाणी पहा
लपून बसते व उंदीर धरते
थबकत थबकत चालते पहा

उड्या मारिते शिंके तोडते
दही-दूध चोरून खाते पहा

आई पाहते काठीने मारते
मनी कशी पळून गेली पहा.

९९. छोटू सरदार

छोट्याशा म्यानामध्ये छोटी तलवार हो छोटी तलवार
छोट्याशा घोड्यावर छोटू सरदार हो छोटू सरदार ॥ धृ ॥

दोहो बाजूला सैन्य तयाचे, छोटे छोटे बहू मजेचे ।
सलाम देती सलाम घेती छोटेसे सरदार ॥ १ ॥

घोड्यावरती स्वार होऊनी जाती अवघड रस्त्यामधुनी
कधी न थकती, कधी न दमती, छोटेसे सरदार ॥ २ ॥

हुकूम सुटता बंदूक घेती, शत्रूवरती रोखुन धरती
आणि काढिती बारही हो, ठो, ठो, ठो, छोटेसे सरदार ॥ ३ ॥

१००. राम राम पाव्हणं

राम राम पाव्हणं या या समदी
बिगी बिगी जाऊ चला शेतामंदी
बैलाची जोडी घेऊ चला, ढवळ्या नि पवळ्याची घेऊन चला
नांगर धरतुया हातामंदी, फिरतुया मी माझ्या शेतामंदी
पावसाच्या लई लई येतील सरी, पानाचं इरलं डोईवरी
या या दावतुया शेतामंदी, धान्याची रास माझ्या
खळ्यामंदी
सुगीचा दिस आज आला खरा, हरबरा काढतुया
बसा जरा
शेकोटी शिलगावू सांच्यापारी कवळालुसा हुरडा भाजू तरी
झननन झननन तालावरी
लेझिम खेळू या ढोलक्यावरी

– ताराबाई परांजपे

१०१. सर्कसवाला आला

अमुच्या गावाला खेळ करण्याला ।
सर्कसवाला आला । हो सर्कसवाला आला ॥धृ॥

दाखवा तिकिट या चला । तंबूमध्ये बसा चला
बँड वाजू लागला । खेळ सुरू झाला हो ॥१॥

लुकु लुकु बघती हत्ती हो । सुपाएवढे कान हो
हालवितो सोंड हो । सलाम करिती तुम्हांला ॥ २ ॥

हे तर आले कोण हो । लंब्या ढांगा टाकीत हो
उंच उंच मान हो । उंटदादा आला हो ॥३॥

हे तर आले घोडेस्वार । टप् टप् घोडा चालवणार
चाल त्यांची ऐटदार । रिंगणात आला हो ॥४॥

फिरती काठी घेऊन हाती । विदूषकाची ऐटच मोठी ।
मधेच मारी हो कोलांटी । खेळ खलास झाला हो ॥५॥

– ताराबाई परांजपे

१०२. नाव

डौलाने चाले कशी नाव माझी रे
झप झप् वल्ही नखवा रे
तुफान उसळे दर्यावरी, दर्याचे राजे आम्ही नावेवरी
वारा बी सुटलाय रेऽऽ दर्या उसळलाय रेऽऽ
नाव परी चाले माझी दर्यावरी ॥ १ ॥

फेकूया जाळे दर्यात आज, गावंल त्यामंदी माशाची रास
बाजाराला जाऊनशान, ठेका धरुया छान
नेसुया साडी जरतारी, संगती जाऊया दर्यावरी ॥ २ ॥

पुनवेचं टिपरं चांदणं आज, दुधानं भरती दर्याला आज
खंजिरी वाजवून शान, ठेका धरुया छान
आनंदे नाचू या दर्यावरी, दर्याचे राजे आम्ही नावेवरी॥३॥

१०३. खेळ

चला मिळून सारे । आता खूप खूप खेळायचं
इंजिन होईन मी । डबे व्हायचं तुम्ही
झुक् झुक् करीत । गावाला हो जायचं ॥ १ ॥

खेळ खेळू नामी । मोटार चालवीन मी
पों पों करीत सहलीला जायचं ॥ २ ॥

होईन विमान मी । आत बसा तुम्ही
गिरक्या मारत आभाळात जायचं ॥ ३ ॥

मजा करू थोडी । खेळू होडी होडी
पाणी कापत समुद्रात जायचं ॥ ४ ॥

होईन मी घोडा । त्याला टांग्याला जोडा ॥
टप् टप् करीत मामाकडे हो जायचं ॥ ५ ॥

१०४. जादूगार

मुले– या हो जादूगारऽऽ या हो जादूगार
पाहू तुमची जादू कैसी आहे मजेदार

जादूगार– आलो, आलो, आलो
जादू आमुची पाहूनि हो घ्या
लाल, पिवळा, सुंदर सुंदर
रुमाल रेशमी घालू अंदर--
छूऽऽ मंतर ॥ १ ॥
रुमाल कैसा बोला ठिपकेदार
पिसे मजेची गोळा केली,
डबा खोलुनी आत घातली
छूऽऽ मंतर
गोड मिठाई पहा तयांची झाली लज्जतदार ॥ २ ॥

१०५. खेळ आमुचे नवे नवे

आम्ही पाखरे इकडूनी तिकडे उडू बागडू मौजेने
खेळ आमुचे नवे नवे
हत्ती होऊन चालू लागू, उंटासम ती मान उभारू
भो-भो-भो मोत्या होऊनी, नक्कल करू या गमतीने
मोर होऊनी नाचू लागू लपुनी कोकीळ गाणी गाऊ
काव-काव-काव-काव कावळा होऊनी
नक्कल करू या गमतीने
बैलगाडी हो दौडत नेऊ मोटारवाला चला बनू
आणि गाडी ही रुळावरुनिया झुकु-झुकु वळवू वेगाने

१०६. खेळ खेळू या

खेळ खेळू या, आता आपण खेळू या
मजेमजेचे खेळ आता आपण खेळू या ॥ धृ ॥

गवळी होऊ या आता गवळी होऊ या
कावड घेऊन खांद्यावरती झरझर चालू या ॥

धोबी होऊ या आता धोबी होऊ या
सप्सप् सप्सप् कपडे धुउनि वाळत घालू या ॥

माळी होऊ या आता माळी होऊ या
फुले वेचुनी आपण मोठे हार गुंफू या ॥

नावाडी होऊ या आता नावाडी होऊ या
वल्हे मारून सरसर सरसर नाव पुढे नेऊ या ॥

सैनिक होऊ या आता सैनिक होऊ या
तिरंगी झेंडा प्रणाम करुनी आपण मिरवू या ॥

१०७. या या आनंदाने खेळू या

या या आनंदाने खेळू या
ठुमकत ठुमकत चालू या ॥ धृ ॥

हाताचे हे पंख पसरुनी
भुर्रकन उडूनी जाऊ या ॥ १ ॥

हाताचा करु मोर पिसारा
थुई-थुई-थुई-थुई नाचू या ॥ २ ॥

हाताचे करु कान सशाचे
टुण्-टुण्-टुण्-टुण् जाऊ या

– ताराबाई परांजपे

१०८. इंजिनदादा इंजिनदादा

इंजिनदादा, इंजिनदादा काय करता ?
डबे मी जोडतो, तुम्हांला नेतो, गावाला जातो नव्या नव्या
इंजिनदादा, इंजिनदादा काय करता ?
पाणी मी पितो, वाफ मी सोडतो, गावाला जातो नव्या नव्या
इंजिनदादा, इंजिनदादा काय करता ?
कोळसा मी खातो, धूर मी सोडतो, गावाला जातो नव्या नव्या
इंजिनदादा, इंजिनदादा काय करता ?
हिरवे निशाण बघतो, चालायला लागतो, गावाला जातो
नव्या नव्या
इंजिनदादा, इंजिनदादा काय करता ?
शिटी मी फुंकतो, गर्दी हटवतो, गावाला जातो नव्या नव्या
इंजिनदादा, इंजिनदादा काय करता ?
लाल निशाण बघतो, उभा मी राहतो, गावाला जातो
नव्या नव्या

—ताराबाई परांजपे

१०९. चिमणा-चिमणीचं लगीन

चिमणा-चिमणीचं लगीन । तिथे वऱ्हाडी कोण कोण ?
कावळा म्हणे मी सोंगाड्या । वाजवीन भों भों भोंगा
मैना म्हणे मी माळीण । टोपलीभर फुले मी आणीन
पोपट म्हणे मी भाट । मंत्र म्हणेन पाठ
मोर म्हणे मी नर्तक । करीन थुई थुई नाच
कोंबडा म्हणे मी आचारी । लाडू वाढीन दुपारी

११०. कोकणचे आजोबा

मी आहे आजोबा
कोकणात राहतो
कोकणातून येताना
खाऊ आणतो—
आंबे अन् फणस!
चला टाका खाऊन
मट् मट् मटक

लाल लाल पगडी
लांब माझा कोट
कमरेला धोतर
अंगावर उपरणं
पायामध्ये माझ्या
पुणेरी जोडा
लाल लाल भडक

नाकावर आरशी
खांद्यावर पडशी
पडशीत चंची
चंचीत सुपारी
कात अन् पानं
ओठ माझे रंगले
लाल लाल चटक

हातात काठी
कंबरेला नोटा
अन् देवाचा पैसा
देवाला जातो
पेढे आणतो
पेढे टाका खाऊन
पट् पट् पटक

–सुमती पायगावकर

१११. डॉक्टर–डॉक्टर

डॉक्टर–डॉक्टर खेळू खेळ
गंमत करू या थोडा वेळ
सुनील, तू नीज गादीवर
मीच होईन हं डॉक्टर
उषा तू ये जरा अशी,
आई होऊन बैस उशाशी

बाटलीत मी पाणी भरीन,
मिठाच्याच पुड्या करीन
थांबा जरा मिनिटभर
चष्मा ठेवतो नाकावर
जरा फुगवतो माझे पोट
बाबांचाच घालतो कोट
माझी असणार एक मोटर
हा मी येणार हं डॉक्टर

बाळ, जरा 'आ' कर,
काखेत जरा नळी धर
पंच्याण्णव आहेच ताप!
चमचा आणा जरा एक,
घशात नाही काही एक
पोट पाहू ढब ढब्,
पाठ पाहू ठक् ठक्

उन्हात गेला होतास ना?
–"ऊंऽऽहूं"
चिंचा खाल्ल्या होत्यास ना?
"ऊंऽऽहूं"
सुई टोचतो जरा हं–
"ऊंऽऽहूं"
पुड्या खारट देईन हं–
"ऊंऽऽहूं"

खाणं जरा हलकं द्या
तळकट विळकट कमी द्या
साबुदाण्याची पेज द्या
मोसंब्याचा रस द्या
दूध द्या कॉफी द्या
प्यायला पाणी गरम द्या
कोणी बरोबर येऊ द्या
एक रिकामी बाटली द्या

सुनील, आता तू डॉक्टर
मी झोपतो गादीवर
छान आहे की नाही खेळ ?
हाच खेळू सारा वेळ

– सुमती पायगावकर

११२. चला चला पळा पळा

चला चला पळा पळा, चला पळा पळा
चला चला पळा पळा, खेळू या चला ॥
हात धरा जोडी करा, होडी हो करा
मंद मंद डुलत डुलत, गावाला चला ॥
हात जरा उंच करा, विमान हो करा
घर घर घर, भर भर भर, गावाला चला ॥
घोड्यावर बसा स्वार, घोडदौड करा
टप् टप् टप्, टप् टप् टप् गावाला चला ॥
एका मागे एक धरा, आगगाडी करा
वळसे घेत, वळसे घेत, गावाला चला ॥

– सरला देवधर

११३. बोकडभाऊ

हे पहा आपले बोकडभाऊ
आहेत कसे केसाळ,
इकडून केस, तिकडून केस,
पांढरे पांढरे नि काळे काळे

शेपटी तर दिसतच नाही–
अगदीच लहान,
आणि मानेखाली काऽऽय बरं ?
ओळखा पाहू . . . . . . दाढी !
पण मिशा मात्र नाहीत हं
शिंगे कशी टोकेरी व पिळदार,

बोकडभाऊ केसाळे
अंग त्यांचे पांढरे काळे
दाढीचे केस लांब लांब,
त्यांना करू राम राम !

– सरला देवधर

११४. होऊ या–होऊ या

टुणु-टुणु टुणु-टुणु बेडुकताई
डरांव-डरांव बोलत राही
आपण उड्या मारू या । बेडुकताई होऊ या ॥ १ ॥
लुसु-लुसु लुसु-लुसु ससेभाऊ
कोवळा पाला हाती घेऊ
हिरव्या कुरणी धावू या । ससेभाऊ होऊ या ॥ २ ॥
हळु-हळु हळु-हळु हत्ती डोले
लांब सोंड ती मजेत हाले
डोलत डोलत चालू या । हत्तीदादा होऊ या ॥ ३ ॥
टप्-टप् टप्-टप् आवाज येई
घोडेदादा धावत जाई
त्याच्यामागे धावू या । घोडेदादा होऊ या ॥ ४ ॥
सुरु-सुरु सुरु-सुरु मासळी होऊ
पाण्यामध्ये लपून राहू
तिच्यासंगे पोहू या । मासळीताई होऊ या ॥ ५ ॥

११५. फूल सई वेच ग

फूलबागेत जा गऽऽ । फूल सई वेच ग,
जाता जाता तोड ग । येता येता तोड ग ॥
फूलबागेत जा ग ऽऽ । फूल सई वेच ग ॥ १ ॥

चालता चालता वेच ग । धावता धावता वेच ग,
फूलबागेत जा गऽऽ । फूल सई वेच ग ॥ २ ॥

मुठी भरुनि वेच ग । दोन्ही हाती वेच ग,
फूलबागेत जा गऽऽ । फूल सई वेच ग ॥ ३ ॥

टोपली भरुनि वेच ग । परडी भरुनि वेच ग,
फूलबागेत जा गऽऽ । फूल सई वेच ग ॥ ४ ॥

ओचा भरुनि वेच ग । पदर भरुनि वेच ग,
फूलबागेत जा गऽऽ । फूल सई वेच ग ॥ ५ ॥

पट्ट-पट्ट वेच ग । चट्ट चट्ट वेच ग,
फूलबागेत जा गऽऽ । फूल सई वेच ॥ ६ ॥

– सरला देवधर

११६. पळा रे पळा

पळा रे पळा,
गोलावर सारे जण पळा रे पळा
उडा रे उडा,
वाऱ्यावर सारे जण उडा रे उडा
नाचा रे नाचा,
थय थय, थय थय, थय थय नाचा रे नाचा
रडा रे रडा,
ऊं, ऊं, ऊं, ऊं – ऊं, ऊं, ऊं, ऊं रडा रे रडा
हसा रे हसा,
हा हा हा हा – ही ही ही ही हसा रे हसा
बसा रे बसा,
डोळे मिटुनि शांत जरा बसा रे बसा
निजा रे निजा
गोलावर सर्व जण निजा रे निजा.

—सरला देवधर

११७. रोज कसा

गवळी अमुचा रोज कसा, रोज कसा
धार दुधाची काढतसे, चुळ चुळ चुळ
सायकलवाला रोज कसा, रोज कसा
पंप भराभर मारतसे, सूं सूं सूं
धोबी अमुचा रोज कसा, रोज कसा
कपडे सगळे धूत बसे, सप सप सप
बंदूकवाला शिपाई हा, शिपाई हा
बार भराभर काढतसे, ठो ऽ ठो ऽ ठो ऽ

११८. मिळुनी खेळू या

मिळुनी खेळू या या या मिळुनी खेळू या
चवडयावरती उभे राहुनी झर झर झर पळू या
गाऱ्या गाऱ्या भिंगोरीचा खेळहि खेळू या
पायाने मग ताल धरोनि ठुमकत चालू या

जोडीने मग हात धरोनी फुगड्या खेळू या
हातांचे मग पंख पसरुनी मारु भरारी, या
पाय पसरुनी बसुनि नगारा दुड्दुड् वाजवू या.

११९. राम नारायण बाजा बजाता

राम नारायण बाजा बजाता
श्रींग श्रींग श्रींग बन्सी बजाता
ढम् ढम् ढम ढम् ढोल बजाता
चिप चिप् चिप् चिप् चिपळी बजाता
झन् झन् झन् झन् झांज बजाता
सारेगम पधनिसा पेटी बजाता
धा धिन् धा धिन् तबला बजाता.

१२०. अंकाचे गाणे

एक दोन तीन
बाहुलीचं लगीन
वरातीचा बँड वाजे
झिन् चक् झिन् ॥ १ ॥

तीन चार पाच
ताऱ्यांचा नाच
ताऱ्यांनी घातला रुप्याचा साज ॥ २ ॥

पाच सहा सात
नाच चाले जोरात
वाऱ्याची झुळझुळ करतेय साथ ॥ ३ ॥

सात आठ नऊ
घरी नका जाऊ
सगळीजणं लग्नाचा
लाडू खाऊन जाऊ ॥ ४ ॥

आठ नऊ दहा
सगळे जमले पहा
वरातीचा थाट कसा दिसतो पहा ॥ ५ ॥ — सरला देवधर

१२१. नवे पाहुणे

नवे पाहुणे नवे पाहुणे
आले अमुच्या आज घरी
उंदिरमामा त्यांचे नाव
गाव त्यांचे घरोघरी

अमुच्या घरचे परी पाहुणे
सफेत अगदी रंगाने
बाहित शिरती खिशात फिरती
घेता जवळी मोजेने

कुणी इथे तर कुणी तिथे तर
भिरभिर फिरती चहूकडे
थरथर हालती मिशा त्यांच्या
चमकति डोळे लाल खडे. — कुसुमाग्रज

१२२. चिऊताई चिऊताई

चिऊताई चिऊताई
माझ्याशी खेळायला येतेस का ?

नको बाई भिऊ
नको बाई पळू
नाही मी बोलणार मारणार तुला

बसायला पाट
जेवायला ताट
पाण्याला भांडे देईन तुला

गोड गोड लाडू
कळी कळी वाटू
दोन दोन दाणे भरवीन तुला।

नेसायला साडी
घराला काडी
बांधायला दोरी देईन तुला

कापसाची गादी
मऊ मऊ साधी
पांघरायला पिसे देईन तुला

नको बाई रुसू
नको बाई फुगू
गोड गोड गाणं, गाईन तुला

येशील ना चिऊ
खाशील ना खाऊ
चिव चिव गाणं गाशील ना

आली बाई आली
चिऊताई आली
गुल गुल गोष्टी करून गेली

—वेणुताई केतकर

१२३. पाऊस पडू दे

वारा वाहू दे गगनात
पाऊस पडू दे शेतात
ढग गर्जू दे गगनात
पाऊस पडू दे रानात
वीज चमकू दे गगनात
पाऊस पडू दे जंगलात

पाऊस पडला जोरानं
शेत भरलं पाण्यानं
पाऊस पडला मोठा फार
रान झालं हिरवंगार ॥ १ ॥

वारा वाहू दे गगनात
पाऊस पडू दे डोंगरात
ढग गर्जू दे गगनात
पाऊस पडू दे तळ्यात

वीज चमकू दे गगनात
पाऊस पडू दे खोऱ्यात
    पाऊस आला पाठोपाठ
    तळी भरली काठोकाठ
    पाऊस पडला जोरानं
    ओढे भरले पाण्यानं ॥ २ ॥

वारा वाहू दे गगनात
पाऊस पडू दे गावात
ढग गर्जू दे गगनात
पाऊस पडू दे बागेत
वीज चमकू दे गगनात
पाऊस पडू दे वाडीत
    पाऊस पडला जोरानं
    विहिरी भरल्या पाण्यानं
    पाऊस पडला मोठा फार
    बागा झाल्या हिरव्यागार ॥ ३ ॥

– सरला देवधर

१२४. खारूताईस

येग येग खारूताई
ये की माझ्या ओसरीवर
सारा दिवस आहेच घाई
बैस जरा घटकाभर

किती छान दिसते बाई
शेपुट तुझी झुपकेदार
कशी झाली खारूताई,
पाठ तुझी पट्टेदार ?

काजळ घालते का ग आई ?
म्हणून डोळे पाणीदार ?
काय खातेस खारूताई ?
कशी झालीस सांग हुशार ?

रानामधली गाणी गा ग
रानामधल्या गोष्टी सांग
ढोलीमध्ये निजता बाई
दुखत नाही का ग आंग ?

रसाळ आंबुस लालट घेई
डाळिंबदाणे आणि बदाम
कुटुर कुटुर ग येऊन खाई
शेंगा, पेरू आणिक जांब

येग येग खारूताई
येना माझ्या ओसरीवर
अगदी रोज रोज येई
माझ्यासाठी घटकाभर.

—सुमती पायगावकर

१२५. अशी आमुची मुले

वडाच्या पारंब्या लोंबतात, लोंबतात
त्याचेच झोपाळे झुलतात, झुलतात
झुलत्या झोपाळ्यावर बसतात, बसतात
अशी आमुची मुले रानची फुले

धीट बाई धिटुकली, धिटुकली
भीत नाही पिटुकली, पिटुकली ॥ १ ॥

छोटे मोठे डोंगर चढतात, चढतात
सशाची शिकार करतात, करतात
लांडग्याची खोड मोडतात, मोडतात
कोल्हे भिऊन पळतात, पळतात
अशी आमुची मुले रानची फुले

धीट बाई धिटुकली, धिटुकली
भीत नाही पिटुकली, पिटुकली ॥ २ ॥

भरभर झाडावर चढतात, चढतात
ताजी ताजी फळे खातात, खातात
खणखण कुदळीने खणतात, खणतात
कडू गोड कंद खातात, खातात

अशी आमुची मुले रानची फुले

धीट बाई धिटुकली, धिटुकली
भीत नाही पिटुकली, पिटुकली ॥ ३ ॥

उन्हातान्हातून हिंडतात, हिंडतात
वाऱ्या पावसाने भिजतात, भिजतात
थंडीचा कडाका सोसतात, सोसतात

अशी आमुची मुले रानची फुले

धीट बाई धिटुकली, धिटुकली
भीत नाही पिटुकली, पिटुकली ॥ ४ ॥

– अनुताई वाघ

१२६. वाघोबा वाघोबा

वाघोबा वाघोबा जंगलचे आजोबा
काळे पिवळे पट्टे गालीचा छान
येवो कोणी जावो कोणी ताठ तुमची मान
किती जाड मिशा काटेरी जशा
बोचणारी नखं बिचव्याची टोकं
पाणी प्यायला जाता ओढ्यावर हळूच
नाही वाजत पाऊल, नाही लागत चाहूल
सावलीच्या अंधारात झाडीमध्ये लपता
लुक् लुक् डोळ्यांनी टुक् टुक् बघता
जंगलभर सारा तुमचा दरारा
भिती वाटे केवढी कोण काढील खोडी
हरिण, ससे, वासरं, नातवंड पोरं
झोपलात घरी की धावतील भिरीभिरी
ऐकली पहा गुर्र गुर्र पळून गेली भुर्र भुर्र

– लीलावती भागवत

१२७. नंदीबैल

आला बघ नंदीबैल ! आई, जाऊ दे
सोड आता लवकर, मज मौज पाहू दे
ऊन नको पाणी मज ओत थंड ते
चोळू नको अंग न का स्वच्छ वाटते ?
पुसले ग मी अंग आता सर्व राहू दे
लाडू खाइन मग, आता आधी धावू दे
धुतलेला सदरा आता नीट घालीन
मागाहुनि गंधहि ते मी नीट लावीन.
बुगुबुगुबुगु गोड कसा ढोल चालतो
खुळुखुळुखुळु घुंगुरही मधुनि वाजतो
सुंदर कशी अंगावर झूल घातली
पोरे बघ बघण्या ही कुठून धावली
नंदीला पैसा दे, खेळ होऊ दे.
नाचू दे नंदी हा मान हलवू दे

—वा. गो. मायदेव

१. काय त्यांचे नाव ?

एक आहेत
गुणगुणे राव
चटकन् चावतात
पळून जातात
गुंगारा देतात
कधीतरी सापडतात
असे हे राव
काय त्यांचे नाव ?
(डास)

ओळखा पाहू !

२. ती कोण ?

आवाज बिवाज
करीत नाही
अशी आहे
छोटू ताई
अंगावर सुळसुळते
अंगावर हुळहुळते
चटकन चावते
कानाकोपऱ्यांत असते
अंथरुणात येते
शोधायला गेले
की निसटून जाते
(पिसू)

३. ही कोण ?

आवाज विवाज
करीत नाही
अशी आहे
छोटू ताई
अंगावरती हुळहुळते
अंगावरती सुळसुळते
बसते नि उठते
शोध लागू देत नाही
घरभर हिंडते
धरायला गेलं
की निसटून जाते

(माशी)

४. तो कोण ?

आवाज बिवाज काही नाही
हळू हळू येतात
एवढ्या मोठ्या माणसाला
हलवून सोडतात
टोळ्यांनी येतात
सैन्याने येतात
माणसावरती चाल करतात
झोपू देत नाहीत
पडू देत नाहीत
असे हे राव
काय त्यांचे नाव ?

(ढेकूण)

– सरला देवधर

१२९. मी कशी, मी कशी ?

आई मी कशी ग, आई मी कशी ?
गोड गोड बोलते पोपट जशी

आई मी कशी ग, आई मी कशी ?
थुई थुई नाचते मोर जशी

आई मी कशी ग, आई मी कशी ?
सरसर धावते खारच जशी

आई मी कशी ग, आई मी कशी ?
भुर्रकन् उडते चिमणी जशी

– ताराबाई परांजपे

१३०. गोरी गोरी नंदा

नंदा आमुची छान ग बाई, गोरी गोरी पान
वेणीमध्ये फूल ग, लाल लाल डूल ग
अंगठी केली खड्याची बाई अंगठी केली खड्याची
दूड हिरव्या मण्यांची बाई दूड हिरव्या मण्यांची
लॉकेटाची साखळी, कुंकवाची टिकली
सोनेरी या बांगड्या बाई सोनेरी या बांगड्या
परकर पोलका खणाचा बाई थाट झाला रुपाचा
चालते ही तालात बाई चालते ही तालात
हासते ही गालात बाई हासते ही गालात.

१३१. विदूषक

लांब नाक्या विदूषक, खेळ खेळतो बेलाशक
उंच टोपी उडवतो, आमचे चेंडू दडवतो
कोणाचीही घालतो चप्पल, कोणालाही देतो टप्पल
रिंगणामध्ये करतो नाच, सर्कशितला राजा हाच
हास हास हासवतो, तोच आम्हांला आवडतो.

– ताराबाई परांजपे

१३२. माऊताई

आल्या आल्या माऊताई । गम्मत होईल छान किती
दूध चुलीवर त्या बघती । दिसे पांढरे शुभ्र किती
दारामागुन वाकुन बघती । हळू हळू जवळी येती
जीभ लाविती सायीला । चटका बसला तोंडाला
म्यॉंव म्यॉंव करीत पळती । कांठी बसली पाठीत
गेल्या गेल्या माऊताई । गम्मत झाली छान कशी

– ताराबाई परांजपे

१३३. एक होता बोकोबा

एक होता बोकोबा। त्याचे नाव काळोबा
काळोबा होते काळे ठुस्स। अंधारातून करतात फुस्स

पिंजऱ्यात होते उंदीरमामा। बोकोबांनी पाहिले त्यांना
आला उंदीर काढू एक। मेजवानीचा केला बेत
पंजा मारला जोरात। अडकून बसला पिंजऱ्यात
पंजा बाहेर निघेना। उंदीर खायला मिळेना

म्याँव म्याँव ओरडले। गुर गुर गुरगुरले
अखेर शेवटी दमले खूप। जिभल्या चाटीत बसले चूप
तिकडून आली आई। तिनं केली घाई
पाय काढला ओढून। अन् बोक्याला दिलं सोडून

–ताराबाई परांजपे

१३४. बदक

बदक बदक
चालतो कसा ?
फदक् फदक्
पाण्यातून पोहतोस
पण भिजत नाहीस
मातीतून चालतोस
पण मळत नाहीस
पिवळे पिवळे
चोच पाय
पंख काय ?
दुधाची साय !
क्वॅक् क्वॅक्
क्वॅक् क्वॅक्
तुमचं गाणं
झॅक् झॅक्!

– सरिता पदकी

१३५. बेबी

बघा माझी बेबी किती आहे तरी गोड
उतरेना खाली, बेबी, जरा तरी सोड

छोटे छोटे नाक हिचे, छोटे छोटे दात
टाळ्या कशा वाजवते छोटे छोटे हात

काळे काळे केस हिचे इवलेसे कान
गोरी गोरी पान ही हसते किती छान

उभी राही किती वेळ छोटे जरी पाय
चालेना ही अजुनही करू तरी काय?

१३६. मनीमाऊ

छान छान छान मनी माऊचं बाळ कसं गोरं गोरं
इवलीशी जिभली, इवलेसे दात
चुटु चुटु खाते कसा दूध आणि भात ॥ १ ॥

इवलेसे डोळे कसे इवलेसे कान
इवल्याशा शेपटीची कशी झाली ही कमान ॥ २ ।

१३७. चिऊताई

चिऊताई चिऊताई
ये ये ये
बाळाचा दाणा
घे घे घे
दाणा खाऊन
उडून जा
नदीच्या पाण्यात
बुडून जा
झाडावरती
चढून जा
बाळ काय करतय
बघून जा
उद्याला येईन
सांगून जा!

– सरिता पदकी

१३८. आंबा पिकतो, रस गळतो

आंबा पिकतो, रस गळतो
कोकणचा राजा बाई झिम्मा खेळतो ॥ धृ० ।

निळ्या आभाळी सांज सकाळी
जगाचा राजा रवि रंग खेळतो ॥ १ ॥

आंब्याच्या उपवनी पानात लपुनि
वसंताचा राजा कुहू -- कुहू बोलतो ॥ २ ॥

पावसाच्या वेळी, ढगांच्या ओळी
थुई - थुई पक्षिराजा नाच नाचतो ॥ ३ ॥

पायांत पैंजण हातात टिपरी
कुंजवनी बाळराजा कृष्ण खेळतो ॥ ४ ॥

– ताराबाई

१३९. आपडी थापडी

आपडी थापडी, गुळाची पापडी
धम्मक लाडू, तेल काढू
तेलंगीचे एकच पान
धर ग बिल्बे हाच कान

*   *   *   *

च्याऊ, म्याऊ, पखालीचे पाणी पिऊ
काशीला जाऊ, खीर खाऊ
भुर्र्र्र्किनी उडून जाऊ.

१४०. गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या

गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या
सई गेली ताकाला
विंचू चावला नाकाला
गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या
आमचा बैल शिंगोऱ्या.

१४१. नखोल्या

नखोल्या बाई नखोल्या । चंदनाच्या टिकोल्या
एक टिकली उडाली । गंगेत जाऊन बुडाली
गंगेला आला लोंढा । भिजला माझा गोंडा
गोंड्याच्या पदरी काडी । भिजली माझी साडी
साडीच्या पदरी रुपाया । भाऊ माझा शिपाया.

१४२. दंडफुगडी

दंडफुगडी दंडाची । बाई माझी पिंडाची
पिंडावरनं जाईन ग । पाच पानं खाईन ग
दिवाळीला बोली केली । दसऱ्याला येईन ग ॥

१४३. फुगडी

एका हाताची फुगडी
मामा देतो लुगडी
लुगड्याला नाही दोरा
मामा माझा गोरा
मामी माझी काळी
शेवंतीची जाळी.

१४४. किस् बाई किस्

किस् बाई किस् । दोडका किस्
दोडक्याची फोड । लागली गोड
आणिक तोड बाई । आणिक तोड

किस् बाई किस् । भोपळा किस्
भोपळ्याचे घारगे । भेंडीचे सांडगे
चटकन् तळ बाई । चटकन् तळ

१४५. कोकणचा राजा झिम्मा खेळतो

खेळ खेळू या मिळूनी खेळू या
अंगणात साऱ्या जणी नाच नाचू या ॥ धृ० ॥

गोलावरती या, हात धरू या
नागपंचमीचा गडे फेर धरू या ॥ १ ॥

जोडी घेऊ या हात धरू या
फुगडी खेळू अंगणात छान घुमवू या ॥ २ ॥

दंड धरू या फुगडी खेळू या
दिवाळीला बोली केली दसऱ्याला या ॥ ३ ॥

एका हाताची फुगडी गमतीची
खेळताना गाणी म्हणू मामा-मामीची ॥ ४ ॥

आंबा पिकतो, रस गळतो, कोकणचा राजा बाई
झिम्मा खेळतो
रोज दुपारी खेळू सुपारी, दोघी जणी फिरू
जैशी फिरे भिंगरी ॥ ५ ॥

– ताराबाई परांजपे

१४६. औडक चौडक

औडक चौडक दामाडू
दामाडूचे पंचाडू
पंचाड खोड खासा
हिरवा दाणा कुडकुडित
राय घोडी व्याली
सोंड पाणी प्यायली
अन्या मन्या शेजीबाईचा
डावा उजवा हातच कन्या.

१४७. झिम्मा

झिम् पोरी झिम्
कपाळाचं भिंग
भिंग गेलं फुटून
पोरी आल्या उठून
आंबा पिकतो, रस गळतो,
कोकणचा राजा झिम्मा खेळतो.

१४८. अटक मटक चणे चटक

अटक मटक चण्णे चटक। चण्णे झाले गोड गोड
मक्याच्या लाह्या फोड फोड
मक्याच्या लाह्या कशाला ? हंडीत भरून ठेवायला
हंडी भरली लाह्यांनी। नारळाच्या खोबऱ्यांनी
टांगुनी ठेवली झाडावर। मुरली वाजवी मुरलीधर
फेर धरला टिपरीचा। गोपाळांच्या आवडीचा
नाचता नाचता झाले दंग। दही-हंडीला चढला रंग
यारे या सगळे या। गोपाळकाला खायला या
गोपाळकाला गोड झाला। गोविंदाने गोड केला

– ताराबाई परांजपे

१४९. आला माझ्या दारी

शेजीबाईचा कोंबडा
आला माझ्या दारी
घालीन कोंडा
पाजीन पाणी ॥ १ ॥

शेजीबाईची बकरी
आली माझ्या दारी
घालीन पाला
पाजीन पाणी ॥ २ ॥

शेजीबाईचा बैल
आला माझ्या दारी
घालीन चारा
पाजीन पाणी ॥ ३ ॥

शेजीबाईचा घोडा
आला माझ्या दारी
घालीन दाणा
पाजीन पाणी ॥ ४ ॥

शेजीबाईचा कुत्रा
आला माझ्या दारी
घालीन भाकर
पाजीन पाणी ॥ ५ ॥

शेजीबाईचा बाळ
आला माझ्या घरी
देईन लाडू
पाजीन पाणी ॥ ६ ॥

– अनुताई वाघ

१५०. आई मी लढाईवर जाणार

आई मी लढाईवर जाणार
इवलीशी ही बंदुक अशशी
खांद्यावर घेणार ॥ धृ० ॥

जाईन शत्रूच्या सामोरी
उडवीन गोळ्या अंगावरी
बंदुकीच्या फेरी झाडुनी
शत्रु ठार करणार ॥ १ ॥

आई तू मज खाऊ पाठव
थोड्या दिवशी कपडे पाठव
जवानापरि युद्धासाठी
तिथेच मी राहणार ॥ २ ॥

जाऊ आपण स्टेशनवरती
सामान घेईन खांद्यावरती
जाताना मी खाली वाकुनी
नमस्कार करणार ॥ ३ ॥

पोचल्यावरी पत्र पाठवीन
लढाईमधल्या गमती कळवीन
परि जाताना तुम्ही सगळे
नाही ना रडणार ? ॥ ४ ॥

घेऊ आम्ही देश जिंकुनी
शत्रु जातील मागे हटुनी
आनंदाने वाजत गाजत
परत आम्ही येणार ॥ ५ ॥

– सरला देवधर

१५१. शूर शिपाई

देशाचे आम्ही शूर शिपाई
भिणार नाही कोणाला
सदा पुढे आम्ही, पुढेच जाऊ
पुढेच नेऊ देशाला

वंदन अमुचे देशाला या
वंदन त्याच्या झेंड्याला
उंचच ठेवू फडकत झेंडा
भिणार नाही मरणाला

बंदुक जरि ही खांद्यावरती
शांती ठेवू चोहिकडे
दुसऱ्या देशा शिकवू शांती
प्रेमाने देऊन धडे

दूरदूरचे कोणि पाहुणे
येता अमुच्या देशाला

म्हणतील वा वा, छान देश हा!
शाबास म्हणतील आम्हांला

देशाचे आम्ही शूर शिपाई
देश आम्हांला हा प्यारा
कुठेहि गेलो, कुठेहि असलो
आठवु भारत हा प्यारा

— सुमती पायगावकर

भजन

१५२. रघुपती राघव राजाराम

रघुपती राघव राजाराम
पतितपावन सीताराम
जानकी जीवन राम नाम
सुंदर माधव मेघःश्याम

महाराष्ट्र

सुधारित

रुपये 6-45

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

रु. ५·२५